सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
Email-prarambh2023@gmail.com
संपादक-जालिंदर ज्ञानदेव धांडे

बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ५ वे ■ अंक १३६ सोमवार दि. १४ जुलै २०२५ RNI MAHMAR/2021/81481 किंमत ३ रुपये ■पाने-४


## देशमुख हत्या प्रकरणातून ॲड. उज्वल निकम यांना दूर करा



प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकारी वकील म्हणून ॲड.उज्वल निकम कामकाज पाहात आहेत परंतु सध्या त्यांची राज्यसभेवर खासदार म्हणून नियुक्ती झाल्यामुळे भविष्यात ते या केसमध्ये पारदर्शक कामकाज करतील की नाही याची शंका आता मराठा समाजातील कार्यकर्त्यांना येवू लागली आहे. यामुळे या प्रकरणात उज्वल निकम यांना दूर करण्याची मागणी आता मराठा समाजातील कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

# बीड जिल्हा परिषदेमध्ये आता ६१ सदस्य

## जिल्हा परिषद पंचायत समितीचे प्रारूप गट, गण जाहीर

### केज तालुक्यातील येवता गट नवीन तर येवता व उमरी नवे पंचायत समिती गण

प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांसाठी बीड जिल्हा परिषदेसाठी प्रारूप विभाग रचना निश्चित करणारे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जाहीर करण्यात आले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार या प्रारूप विभाग रचनेची अंमलबजावणी होणार आहे. जिल्हा परिषदेमध्ये पूर्वी ६० जि.प.सदस्य होते परंतु आता होणाऱ्या निवडणूकीत एक सदस्य वाढला आहे. केज तालुक्यातील येवता हा नवीन गट तयार झाला आहे. यामुळे आता जिल्हा परिषदेमध्ये ६१ सदस्य असणार आहेत. तर पंचायत समितीमध्ये येवता व उमरी हे दोन नवीन गण असणार आहेत. सध्या निवडणूक विभागाकडून निवडणुकीच्या अनुषंगाने जोरदार तयारी सुरू दिसत आहे. यासंदर्भात कोणाचा काही आक्षेप असेल तर २१ जुलैपर्यंत हे आक्षेप नोंदवता येणार आहेत.

▶▶ पान २ वर...




गेवराई तालुक्यात गट-९ बीड-८, आष्टी-७ केज-७, माजलगाव-६ परळी-६, अंबाजोगाई-६ पाटोदा-३, धारूर-३ वडवणी-२ शिरूर-४ धारूर-३

### अशी असणार जिल्ह्यातील तालुकानिहाय गटसंख्या

- ♦ **बीड (गट-८)** नवगण राजुरी, बहिरवाडी, पिंपळनेर, नाळवंडी, पाली, नेकनूर, लिंबागणेश, चौसाळा
- **गेवराई (गट-९)** रेवकी, तलवडा, जातेगाव, गढी, धोंडराई, उमापूर, चकलांबा, मादळमोही, पाडळसिंगी
- **माजलगाव (गट-६)** केसापुरी, गंगामसला, टाकरवण, तालखेड, पात्रुड, दिंद्रुड
- **केज (गट-७)** विडा, येवता, आडस, होळ, चिंचोलीमाळी, नांदूरघाट, युसूफवडगाव
- **अंबाजोगाई** (गट-६) जोगाईवाडी, घाटनांदूर, पट्टीवडगाव, बर्दापूर, चनई, पाटोदा म.
- **परळी (गट-६)** सिरसाळा, पिंपरी बु., मांडवा (परळी), मोहा, जिरेवाडी, धर्मापुरी
- **आष्टी (गट-७)** दौलावडगाव, धामणगाव, धानोरा, लोणी (स.), कडा, मुर्शदपूर, आष्टी (ह.ना.)
- **पाटोदा (गट-३)** डोंगरकिन्ही, अंमळनेर, पारगाव घु.
- **शिरूर (गट-४)** घाटशिळ पारगाव, रायमोहा, पाडळी, पिंपळनेर
- **धारूर (गट-३)** तेलगाव, भोगलवाडी, आसरडोह **वडवणी (गट-२)** उपळी, चिखलबीड

# जिल्हाधिकारी साहेब, वनविभागाला नवीन झाडे लावायचे सोडा आहे त्यांचेही रक्षण करता येईना

## जिल्ह्यात सुरु असलेल्या सॉमिल कोणाच्या आशीर्वादाने

## अनेक ठिकाणी बेसुमार वृक्षतोड सुरु; वनविभागाचे दुर्लक्ष



वनविभागील निगरगट्ठ अधिकारी हाकलण्याची गरज



प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : जिल्ह्यात चार पाच वर्षाआठ दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होते. याचे मुख्य कारण म्हणजे जिल्ह्यामध्ये फक्त २.४० वनक्षेत्र शिल्लक राहिले आहे. एवढी गंभीर समस्या असताना सुद्धा वनविभाग काहीच करताना दिसत नाही. नवीन झाडे लावायचे तर सोडा, जिल्ह्यात आहे त्या झाडांचे रक्षण करण्यातही वनविभाग अपयशी ठरत आहे. बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात सॉमिल सुरू असून या सॉमिल कोणाच्या आशीर्वादाने सुरु आहेत? असाही प्रश्न याठिकाणी उपस्थित होत आहे. सध्या सर्वत्र मान्सून सुरू असून याच मान्सूनमध्ये वनविभागाने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे अपेक्षित असताना सुद्धा वनविभागाचे अपेक्षित असे काम दिसत नाही. यामुळे जिल्हाधिकारी साहेब आपणच आता वनविभागातील या निगरगट्ठ अधिकाऱ्यांना सूचना करून बीड जिल्ह्यात वनक्षेत्र वाढीसाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी होत आहे. ( पान २ वर)




# जिल्हाधिकारीसाहेब, हे गौणखनिज आहे का?

## संबंधित नायब तहसीलदार काम सोडून दुसरेच उद्योग करू लागले?

प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : बीड जिल्ह्यामध्ये अनेक अधिकाऱ्यांवर राजकीय वरदहस्त असल्यामुळे येथील अनेक अधिकारी स्वत: मनमानी कारभार करताना दिसत आहे. बीड तहसील कार्यालयातील असेच एक नायब तहसीलदार स्वत:चा मनमानी कारभार करताना दिसत आहेत. विशेषत: त्यांच्याकडे जो विभाग आहे त्या विभागाचे काम न करता ते कायम बाहेरच असतात. गेल्या दोन-तीन दिवसांपूर्वी रस्ते कामावरील दोन हायवे पकडल्या आहेत. विशेष म्हणजे केंद्रियमंत्री नितीन गडकरी यांच्या आदेशाप्रमाणे नॅशनल हायवेचे काम करणाऱ्या गाड्यांना कोणीही आडवू शकत नाही असा जीआर असताना सुद्धा संबधित नायब तहसीलदार यांनी माती वाहून नेणारे दोन हायवा पकडून बीड तहसीलमध्ये लावले आहेत. यामुळे संबंधित ठेकेदाराने गेल्या तीन दिवसांपासून संबंधित रस्त्याचे काम बंद ठेवले आहे. विशेषत: या वाहनावर जोकाही दंड आकारून ही वाहने नियमाप्रमाणे पंचनामा करून कारवाई करणे अपेक्षित असते परंतु तसेही यासंदर्भात काही झाल्याचे दिसून येत नाही. यामुळे संबंधित जे कोणी नायब तहसीलदार आहेत यांना जिल्हाधिकारी महोदयांनी विशेष सूचना करण्याची गरज आहे.

# धनंजय मुंडेच्या बॅनरवर झळकले आरोपी वाल्मिक कराडचा फोटो




प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मिक कराडच्या दोषमुक्त अर्जावर २२ जुलैला सुनावणी होणार आहे. परंतु सध्या वाल्मिक कराड देशमुख प्रकरणातील मुख्य आरोपी असल्याने कराडवर सर्वत्र रोष पहायला मिळत आहे तर दुसरीकडे आ.धनंजय मुंडे यांचा उद्या वाढदिवस असल्यामुळे परळीमध्ये धनंजय मुंडे यांच्या शुभेच्छांचे बॅनर लागले आहेत या बॅनरवर आरोपी वाल्मिक कराडसुद्धा झळकत आहेत. आमदाराच्या बॅनरवर आरोपी असलेल्या वाल्मिक कराडचे फोटो झळकल्यामुळे राज्यभरात याची चर्चा होत आहे. एखाद्या गंभीर प्रकरणात आरोपी असूनसुद्धा आमदाराच्या बॅनरवर वाल्मिक कराडचे फोटो लावण्यात आल्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. तसेच धनंजय मुंडे यांनी कार्यकर्त्यांना माझा वाढदिवस साजरा न करण्याचे आवाहनही केले आहे. करायचाच असेल तर बॅनरबाजी न करता सामाजिक उपक्रमातून गरजूंना मदत करावी असेही आवाहन करण्यात आले आहे.

# 'जनसुरक्षा नव्हे जनमुस्कटदाबी!'

## विधेयकाच्या विरोधात सामाजिक कार्यकर्त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने




बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने विधिमंडळ अधिवेशनात मंजूर केलेले "जनसुरक्षा विधेयक २०२५" हे लोकशाहीला घातक असून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहे, असा आरोप करत आज दि.१४ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते व माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे जिल्हा प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, राज्यपाल पी.सी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री ▶▶ पान २ वर...




बीड: बीड पंचायत समितीचे माजी सभापती बळीराम गवते यांनी जिल्हा परिषदचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांची भेट घेऊन सत्कार केला. यावेळी पंचायत समिती अंतर्गत सुरू असलेल्या आणि रखडलेल्या योजना बाबत सविस्तर चर्चाही केली. यावेळी प्रलंबित विषय निकाली काढू , असा शब्द सीईओ रहमान यांनी दिला.

# यावर्षी वाढदिवस सोहळा साजरा करणार नाही - आ.धनंजय मुंडे

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांचा येत्या १५ जुलै रोजी वाढदिवस असून, यावर्षी आपण वाढदिवस साजरा करणार नसून सहकारी व कार्यकर्त्यांनी वाढदिवसाचे सोहळे आयोजित करू नयेत, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.



धनंजय मुंडे यांचा वाढदिवस हा दरवर्षी चाहते व कार्यकर्त्यांसाठी मोठी पर्वणीच असतो, मात्र यावर्षी मराठवाड्यात बहुतांश भागात पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांवर ▶▶ पान २ वर...

# वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीसाठी दाखल करण्यात आलेले प्रीतम आणि यशश्री मुंडे यांचे अर्ज वैध

बीड । प्रतिनिधी


दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे, पंकजा मुंडे , प्रीतम मुंडे यांच्यानंतर मुंडे घराण्यातील तिसरी कन्या यशश्री मुंडे या देखील राजकारणात सक्रीय होत आहेत. यंदा बीडमधील वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीच्या रिंगणात त्या उतरल्या आहेत. वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव बँकेच्या निवडणुकीनिमित्त यशश्री मुंडे यांनी शुक्रवारी अर्ज दाखल केला आहे. यानिमित्ताने यशश्री मुंडे या राजकारणात सक्रिय होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. अशातच वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीसाठी दाखल करण्यात आलेले प्रीतम आणि यशश्री मुंडे यांचे अर्ज वैध ठरले असल्याची माहिती समोर आली आहे. ▶▶ पान २ वर...





# रक्ताचे नाते

प्रत्येक व्यक्तीचा एक ठरावीक रक्तगट असतो. हा रक्तगट ठरवताना रक्तातील अनेक घटक लक्षात घेतले जातात. प्रत्येकाला स्वत:चा रक्तगट कोणता हे माहिती असणे आवश्यक आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला काही कारणाने बाहेरून रक्त घेण्याचा प्रसंग येतो किंवा दुसऱ्याला रक्त देण्याची निकड निर्माण होते, तेव्हा त्या व्यक्तीला त्याचा स्वत:चा रक्तगट




माहीत असण्याचा फार मोठा फायदा होऊ शकतो. ज्या गुणधर्मामुळे रक्तगट ठरवले जातात त्याच गुणधर्माला अनुसरून रक्तगट ओ असलेली व्यक्ती इतर सर्व रक्तगटाच्या व्यक्तींना रक्त देऊ शकते. म्हणून ओ रक्तगटाच्या व्यक्तीला वैश्विक रक्तदाता म्हणतात. त्या उलट त्या व्यक्तीला मात्र फक्त ओ रक्तगटाच्या व्यक्तीचेच रक्त चालते. तसेच एबी रक्तगटाच्या व्यक्तीचे रक्त इतर कोणालाच चालणारे नसते; परंतु त्या व्यक्तीला इतर सर्व रक्त गटांच्या व्यक्तीचे रक्त चालते. म्हणून एबी रक्तगट असलेली व्यक्ती वैश्विक रक्त घेणारा असे संबोधले जाते. ॲनिमिया, रक्ताचा कर्करोग, थॅलिसिमिया किंवा तत्सम गंभीर आजार असलेल्या रुग्णावर उपचार करण्यासाठी रक्ताची सतत गरज पडत असते. आपल्या देशात ही गरज फार मोठ्या प्रमाणात आहे. तसेच काही वेळा बाळाला जन्म देताना किंवा अपघातादरम्यान अति रक्तस्त्राव झाल्यानेही रक्त द्यावे लागते. अशा अनेक कारणासाठी रक्ताची आवश्यकता वारंवार भासत असते आणि म्हणूनच रक्ताची साठवणूक रक्तपेढ्यातून केली जाते. परंतु तुलनेने यासाठी रक्तदानातून प्राप्त होणारे रक्तदानाचे प्रमाण आपल्याकडे केवळ ०.९९ टक्के एवढेच आहे. प्रत्येक राज्यातील, राज्य रक्त संक्रमण समिती रक्त पेढ्याकडून साठवलेल्या रक्ताचा तपशील वेळेवर सादर करत असते. या समितीने नुकत्याच दिलेल्या अहवालानुसार २०२४ सालात महाराष्ट्र राज्यात एकूण एकवीस लाख बत्तीस हजार युनिट एवढेच रक्त संकलित झाले. त्यात पुरुष रक्तदात्यांची संख्या ९३.९८% तर स्त्री रक्तदात्यांची संख्या केवळ ६.१% एवढीच होती. अनेक सरकारी रुग्णालयातील रक्तपेढ्या गरजू रुग्णांना आवश्यकतेनुसार रक्त आणि रक्त उत्पादने (घटक) पुरविण्याची कामगिरी करत सामुदायिक आरोग्याची भूमिका बजावत असतात. खासगी रुग्णालये व स्वयंसेवी संस्थातर्फेही रक्तपेढ्यास चालवणे, रक्तदान शिबिरे आयोजित करत जागरूकता निर्माण केली जाते. रक्तपेढी चालविण्यासाठी १९४० च्या औषध आणि सौंदर्य प्रसाधन कायद्यांतर्गत नोंदणी करून नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

रक्त पेढ्यातून रक्ताची चाचणी करणे, रक्तावर प्रक्रिया करणे, गरजेनुसार पुरवता यावे यासाठी प्लेटलेट्स, प्लाझ्मा, लाल रक्तपेशी साठवून ठेवणे इत्यादी गोष्टी केल्या जातात. कोणत्याही रक्तपेढीतून प्राप्त करून घेतलेल्या चुकीच्या रक्त संक्रमणामुळे संस्था किंवा संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रार नोंदवता येते. योग्य प्रतिसाद न मिळाल्यास पुढे ग्राहक न्यायालयाकडे दाद मागता येते. रक्तदान न करण्यासाठी अनेक गैरसमज कारणीभूत ठरतात. जसे की, वजन कमी होणे, आयुष्य कमी होणे वगैरे; परंतु हे गैरसमज दूर करुन रक्तदानाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन समाजात निर्माण झाला पाहिजे. खरे तर रक्त दान केल्याने रक्ताभिसरण सुधारणे, नवीन रक्त पेशी तयार होण्याची प्रक्रिया सुधारणे, रोगप्रतिकारक शक्ती वाढणे, हृदयविकाराचा धोका कमी होणे, लोहाचे प्रमाण नियंत्रित राहाणे असे अनेक फायदे असतात; परंतु हृदयाशी संबधित आजार असलेली व्यक्ती, कर्करोगाचा रुग्ण, एचआयव्ही बाधित व्यक्ती, गर्भार व स्तनपान करणारी महिला व अमली पदार्थाचे सेवन केलेली व्यक्ती यांना मात्र रक्तदान करता येत नाही. तसेच, दातावर उपचार चालू असताना व नंतर एक महिन्यापर्यंत, टायफॉइड किंवा कॉलराची लस घेतल्यावर पंधरा दिवस किंवा मलेरिया आजारावर तीन महिने आधी उपचार घेतलेले असेल, तर तसेच रेबीसवर एक वर्षापूर्वी लस घेतलेली असेल तर अशा व्यक्ती रक्तदान करू शकत नाही. रक्तदान करण्यासाठी हिमोग्लोबीनचे प्रमाण कमीतकमी १२.५ ग्रॅम/मि.ली. व वयोमर्यादा १८ ते ६५ एवढी असावी लागते. रक्तदानाच्या वेळी एका व्यक्तीचे ३५० मि.ली एवढे रक्त घेतले जाते आणि तीन महिन्याने पुन्हा रक्तदान करता येऊ शकते. इतरांच्यासाठी रक्तदान करणारी व्यक्ती स्वत:ला निरोगी ठेवण्याचा प्रयत्न करत असते. त्यासाठी रक्ताची नियमित चाचणी करून घेण्याचा सल्ला डॉक्टर देत असतात. वयाच्या तीस वर्षांनंतर सीबीसी हिमोग्लोबीनसाठी, एचबीए १ सी डायबीटीससाठी, तर रोगप्रतिकारकशक्तीसाठी डब्ल्यूबीसी, त्याशिवाय थायरॉईड या गोष्टींची चाचणी जरूर करून घ्यावी. कायद्याने पैशासाठी रक्तदान करता येत नाही. कर्तव्य भावनेतून रक्तदान करणाऱ्या निरोगी व्यक्तीला काही कारणांनी रक्ताची गरज निर्माण झालीच, तर त्याला हक्काने (कायद्याने) रक्त उपलब्ध करून घेणे सुलभ होते. रक्ताचे नाते कितीही महत्त्वाचे असले तरी, रक्तदान करून एक माणुसकीचे नाते आपण समाजात नक्कीच निर्माण करू शकतो. शिवाय भविष्यात आपणही रक्ताचे ग्राहक होऊ शकतो हे लक्षात ठेऊन आधीच रक्तदान करून ठेवलेले चांगले.

# मुंबईत श्रीमंतांची संख्या वाढली...

गेल्या ११ वर्षांत, स्टार्टअप्स, विज्ञान, क्रीडा, सामुदायिक सेवा, संस्कृती आणि इतर विविध क्षेत्रांमध्ये अकल्पनीय कामगिरी करणाऱ्या तरुणांची उल्लेखनीय उदाहरणे आपण पाहिली आहेत. त्याच्याच एक पाऊल पुढे जाऊन गेल्या आठवड्यात क्रीसीलच्या सहकार्याने ३६० वन वेल्थ क्रियेटर लिस्टचा पहिला अंक प्रसिद्ध केला गेला. ही भारतातील आघाडीच्या संपत्ती आणि मालमत्ता व्यवस्थापन करणाऱ्या कंपन्यांपैकी एक आहे. या यादीमध्ये किमान ५ अब्ज रुपये किंवा त्याहून अधिक संपत्ती असलेल्या व्यक्तींचा समावेश आहे. या यादीत एकूण २ हजार १३ संपत्ती निर्माण करणाऱ्यांचा समावेश आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी म्हणून आघाडीवर असून येथे ५७७ संपत्ती निर्माण करणारे राहतात आणि या यादीतील एकूण संपत्तीच्या ४०% वर नियंत्रण ठेवतात त्यामध्ये उद्योजक, व्यावसायिक, गुंतवणूकदार आणि वारसदार असून त्यांची एकत्रित संपत्ती सुमारे १०० ट्रिलियन रुपये एवढी आहे. देशाच्या जीडीपीच्या एक तृतीयांश इतकं हे प्रमाण आहे. यामधील मध्यम संपत्ती १४.२ अब्ज रुपये म्हणजेच १ हजार ४२३ कोटी रुपये इतकी आहे. यात आकाश अंबानी आणि अनंत अंबानी हे ३.५९ लाख कोटी रुपयांच्या संपत्तीसह सर्वात श्रीमंत भारतीय म्हणून अग्रणी आहेत. १६१ व्यक्तींची संपत्ती प्रत्येकी १०० अब्ज रुपयांपेक्षा जास्त आहे, तर १६९ व्यक्तींची संपत्ती ५० अब्ज रुपये ते १०० अब्ज रुपये दरम्यान आहे. टाटा ग्रुप, रिलायन्स इंडस्ट्रीज आणि अदानी ग्रुपशी संबंधित कुटुंबीय आणि प्रवर्तक मिळून सुमारे २४% प्रवर्तक संपत्तीचे प्रतिनिधित्व करतात. ही संपत्ती अंदाजे ३६ लाख कोटी रुपये इतकी आहे. ३६० वन वेल्थ क्रियेटर लिस्ट ही भारताच्या आर्थिक भवितव्याला आकार देणाऱ्या व्यक्ती आणि कुटुंबांची नोंद घेणारा एक मैलाचा दगड ठरणारा उपक्रम आहे. नवी दिल्ली आणि बंगळूरमध्ये अनुक्रमे १७% आणि ८% संपत्ती निर्माते आहेत, तर अहमदाबादमध्ये सर्वात श्रीमंत भारतीयांपैकी ५% राहतात. भारतात ४० वर्षांखाली १४३ सक्रिय संपत्ती निर्माण करणारे आहे. त्यापैकी अनेकजण डिजिटल-प्रथम व्यवसाय मॉडेल्समध्ये अग्रणी आहेत. यामध्ये भारत पेचे शाश्वत नक्राणी हे २७ वर्षांचे असून सर्वात तरुण आहे. ही यादी केवळ श्रीमंतांची नसून ती भारताच्या उद्योजकीय आकांक्षा, पिढ्यानपिढ्या चालत आलेली वारसा परंपरा आणि उदयास येणाऱ्या आर्थिक प्रवाहाच प्रतिबिंब आहे. भारतातील अग्रणी ५० व्यावसायिक घराणी ३६० वन वेल्थ क्रियेटर लिस्टमध्ये नोंदवलेल्या एकूण संपत्तीपैकी सुमारे



५९% संपत्तीवर नियंत्रण ठेवतात. केवळ रिलायन्स इंडस्ट्रीज आणि अदानी एंटरप्रायझेस या दोन कंपन्यांचं एकत्रित योगदान एकूण संपत्तीपैकी १२ % इतकं आहे. ३६० वन वेल्थ क्रियेटर लिस्टवरील सुमारे ७१% व्यक्ती पुरुष आहे आणि त्यांच्याकडे एकूण संपत्तीपैकी ७६% मालकी आहे. महिलांचं औषधनिर्मिती क्षेत्रात अधिक चांगलं प्रतिनिधित्व असून तिथे त्या फार्मा क्षेत्रातील अब्जाधीशांपैकी ३३% आहे. दुसरीकडे, वित्तीय क्षेत्रातील रुपयातील अब्जाधीशांपैकी २४ % महिला आहे आणि त्या क्षेत्राच्या प्रवर्तक संपत्तीपैकी १३% चे प्रतिनिधित्व करतात. पुरुषांची मध्यम संपत्ती १ हजार ४७५ कोटी रुपये असून, ती महिलांच्या १ हजार २१५ कोटी रुपये मध्यम संपत्तीपेक्षा २२% अधिक आहे. सरासरी संपत्तीच्या बाबतीत, वारसाहक्काने संपत्ती प्राप्त केलेल्या महिला त्यांच्या पुरुष समकक्षांपेक्षा सुमारे २३% अधिक श्रीमंत आहेत. याचे एक कारण असे आहे की, मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप व्यवसायांच्या मालकांच्या तुलनेत १०० अब्ज रुपये संपत्ती असलेल्या व्यक्तींनी; विशेषतः मुकेश अंबानी आणि शिव नाडार यांनी त्यांच्या पुरुष आणि महिला वारसांमध्ये अधिक समतोल पद्धतीने संपत्ती हस्तांतरित केली आहे. ३६० वरील महिला वारसांपैकी १०% महिला १०० अब्ज रु. संपत्ती गटात मोडतात. भारतातल्या एकूण संपत्ती निर्मितीमध्ये औषधनिर्माण, माहिती तंत्रज्ञान सॉफ्टवेअर ॲण्ड सर्व्हिसेस आणि वित्तीय सेवा या तिन्ही क्षेत्रांचा मिळून सुमारे २६ % वाटा आहे. यामध्ये फार्मा क्षेत्राने सर्वाधिक म्हणजे १७४ संपत्ती निर्माते यांसह आघाडी घेतली आहे. त्यानंतर वित्तीय सेवा १५८ आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात १३४ जण आहेत. फार्मा क्षेत्रातील सर्वात श्रीमंत उद्योजक दिलीप शांतिलाल संघवी आहेत, तर फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये नितीन कामत आणि निखिल कामत हे सर्वात श्रीमंत आहेत. तंत्रज्ञान क्षेत्रात अझीम एच. प्रेमजी हे सर्वोच्च स्थानी आहेत. बँकिंग क्षेत्रात दर व्यक्तीमागे सरासरी संपत्ती ८ हजार ५०० कोटी, दूरसंचार क्षेत्रात ८ हजार ४०० कोटी, विमानवाहतूक क्षेत्रात ७ हजार ९०० कोटी रु. आहे. बँकिंग क्षेत्रात १३ अब्जाधीश रु. असणारे आहेत, दूरसंचारमध्ये २१, विमानवाहतूक क्षेत्रामध्ये ९ जण आहेत. भारताच्या सर्वात श्रीमंत व्यक्तींची संपत्ती सूचिबद्ध कंपन्यांमध्ये केंद्रित आहे. ६०७ सार्वजनिकरीत्या सूचिबद्ध कंपन्या १ हजार ७२६ व्यक्तींच्या एकूण वैयक्तिक संपत्तीपैकी ९३% हिस्सा दर्शवतात.

३६० वन वेल्थ क्रियेटर लिस्टवरील वाढत्या संख्येतील व्यक्ती त्यांच्या स्वतःच्या व्यवसाय साम्राज्याच्या पलीकडे बघत असून देशातील स्टार्टअप इकोसिस्टममध्ये भर घालत आहेत: यादीतील ५८ जण आणि त्यापैकी ९०% हे पहिल्या पिढीतील उद्योजक असून त्यांनी अशा प्रारंभिक टप्प्यातील स्टार्टअप्समध्ये गुंतवणूक केली आहे. ते आता युनिकॉर्न किंवा सूनीकॉर्न स्थानापर्यंत पोहोचले आहेत. भारताच्या ३० संपत्ती निर्मात्यांपैकी २८ पहिल्या पिढीतील उद्योजक बायोफार्मा, बायोटेक, फिनटेक, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सॉफ्टवेअर-ॲज-अ-सर्व्हिस आणि मानवरहित हवाई यंत्रणा किंवा ड्रोन्स यांसारख्या अत्याधुनिक नवकल्पनांमधून संपत्ती निर्माण करत आहेत. या यादीत एकूण ५४० महिलांचा समावेश आहे. ईशा अंबानी या महिलांमध्ये सर्वात श्रीमंत व्यावसायिक मालक आहेत. याव्यतिरिक्त, या यादीत ७२ अशा महिला नेतृत्वकर्त्यांची नोंद झाली. या ७२ महिला नेतृत्वकर्त्यांपैकी २९ जणींनी आरोग्यसेवा, औषधनिर्माण, आयटी आणि अभियांत्रिकी क्षेत्रांमध्ये आपली छाप सोडली आहे, तर २१ जणी पहिल्या पिढीतील उद्योजिका आहेत. या पहिल्या पिढीतील महिला नेतृत्वकर्त्यांनी ई-कॉमर्स सोल्यूशन्स, माहिती तंत्रज्ञान सॉफ्टवेअर ॲण्ड सर्व्हिसेस आणि फायनान्शियल सर्व्हिसेस यावर विशेष लक्ष केंद्रित केले असून, पहिल्या पिढीतील महिला नेतृत्वकर्त्यांच्या एकूण संपत्तीपैकी ७२ % वाटा या क्षेत्रांमधून आलेला आहे. हा अहवाल तयार करण्यात ३६० वन वेल्थ क्रियेटर लिस्ट संस्थापक, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी करण भगत, यतीन शाह, क्रीसील इंटेलिजन्सच्या अध्यक्ष व व्यवसाय प्रमुख प्रीती अरोरा यांचा प्रमुख वाटा आहे. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा स्टार्टअप इकोसिस्टम आहे, ज्यामध्ये तरुणाई आघाडीवर आहे. भारतातील स्टार्टअप इकोसिस्टम तरुणांमुळे अभूतपूर्व वेगाने भरभराटीला येत आहे. हे केवळ महानगरांपुरते मर्यादित नाही, तर ती आता एक सामाजिक संस्कृती बनली आहे, असे मोदी म्हणाले. हेच खरे आहे.

पान १/४ वरून

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती

विविध उपक्रम आयोजित केले जातील.पुरुषोत्तम वीर यांनी यावेळी सांगितले की, ''अण्णाभाऊ साठे हे वंचित समाजासाठी आदर्श व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या कार्याची जयंती उत्सव समितीद्वारे समाजापर्यंत पोहोचविणे हा आमचा उद्देश आहे.''मिलिंद सरपते यांनीही सांगितले की, ''लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या अभंगांनी आणि साहित्याने समाजाला एकत्र करण्याचे काम केले आहे. त्यांच्या जयंती उत्सवातून त्यांच्या विचारांचा आणि संदेशाचा प्रसार व्हावा, यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.''या उत्सवाद्वारे समाजातील शोषित घटकांना सशक्त करण्यासाठी आणि सामाजिक समरसतेसाठी काम करण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला आहे. लवकरच या जयंती उत्सवाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित होणार आहेत.

## मंत्री पंकजा मुंडेंच्या

लागू केल्यापासून शेतकऱ्यांचे पशुधन पूर्णपणे धोक्यात आले आहे. जनावरांचे बाजार उध्वस्त झाले आहेत. मराठवाड्यातील लाल कंधारी, देवणी आणि विदर्भातील गवळाऊ, तसेच पश्चिम महाराष्ट्रातील खिलार या गोवंशाची संख्या झपाट्याने कमी झाली.अनेक शेतकऱ्यांनी गोरक्षक, बजरंग दल आणि पोलिसांच्या हप्ते खोरीमुळे पशुपालन बंद केले. परिणामी दुधाच्या भेसळीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. जर्सी,होस्टेन सारख्या संकरित गायी आणि बैलांच्या वाहतुकीवर निर्बंध आल्याने व्यवसायावर विपरीत परिणाम झाला. खाटीक समाजासह बैल बाजारावर अवलंबून असणाऱ्या घटकांवर उपासमारीची वेळ आली. हजारो वाहतूकदारांना पोलिसी कारवाईला तोंड द्यावे लागत आहे. शेतीमाल विक्रीसाठी बाजार समित्यात आल्यानंतर शेतकऱ्यांची होणारी लूट पाहता शेळ्या, मेंढ्या, कुकुटपालन, मत्स्यपालन, वराह पालन आदी. व्यवसायाला शेतीचा दर्जा मिळाल्यानंतर शेतकऱ्यांची लूट मोठ्या प्रमाणावर होणार आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्यांमध्ये मोठी वाढ होईल अशी भीती शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी व्यक्त केली आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)

पाहून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, तथा युवकांचे प्रदेशाध्यक्ष महबूब भाई शेख यांनी जिल्ह्याचे नेतृत्व करण्याची संधी दिली असल्याचे बोलले जात आहे.

बीड जिल्हा युवक कार्याध्यक्ष पदी नियुक्ती केल्याबद्दल खा.शरदचंद्रजी पवार, सुप्रियाताई सुळे ,प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील ,खासदार बजरंग (बप्पा) सोनवणे, मा.आमदार पृथ्वीराज साठे, डॉ.नरेंद्र काळे, राजेभाऊ फड, व्यंकटेशजी चामणर , अमर (भैय्या) देशमुख, अंकुशरावजी ढोबळे या सर्वांचे आभार मानले आहेत. येणाऱ्या काळात शिव, शाहू, फुले,आंबेडकर, आण्णाभाऊ यांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी व शरदचंद्रजी पवार यांचे विचार युवकांपर्यंत पोहचवण्याचे काम प्रामाणिकपणे करत राहील :- ॲड.प्रशांत पवार

## जानकीच्या आनंदाला

व्हीलचेअर वाटप करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. समाजामध्ये अशा विविध समाज घटकांना आधार देण्याचं काम टायगर ग्रुप मराठवाडा अध्यक्ष गोरक्षक उमेश भाऊ पोखरकर यांच्या संकल्पनेतून आशादत्त बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून करण्यात येत आहे. राजेंद्र पोखरकर यांनी आपली मुलगी जानकी हिचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याच्या प्रेरक कृतीचे सर्वस्तरांतून कौतुक करण्यात येत आहे. यावेळी पोलीस मित्र संघटनेचे पदाधिकारी, गोरक्षक उमेश भाऊ पोखरकर, राजेंद्र भैय्या, दिपक लामतुरे, बालाजी रूद्राक्ष, कोंडीराम पवार, आदित्य देशमुख, दीपक पवार, स्वप्नील सोनवणे, तिरूपती राठोड व संपूर्ण पोखरकर कुटूंबिय, नातेवाईक आणि मित्र परिवार उपस्थित होता.

## श्री क्षेत्र चाकरवाडी येथे ह.भ.प महादेव

शेवा पंधरवडा निमित्त वृक्ष लागवड केली आहे.

पान १/४ वरून

तसेच या ठिकाणी प्रत्येक महिन्याला महिनावारी भरत असते यावेळी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त माऊली महाराज यांच्या दर्शनासाठी चाकवाडीला येत असतात यावेळी वारीमध्ये प्रचंड प्रमाणामध्ये प्लास्टिकचा वापर होतो हे देखील पर्यावरणास हानिकारक असल्यामुळे श्री गणेश लांडे यांनी कापडी पिशव्यांचे वाटप करून प्लास्टिक मुक्त वारी व्हावी याकरिता सेवा पंधरवड्याच्या सहाव्या दिवशी हा उपक्रम राबवल्याचे त्यांनी प्रसिद्ध पत्रकार द्वारे कळवले आहे.या वृक्ष लागवडी प्रसंगी ह भ प महादेव महाराज व चकवाड़ी चे उपसरपंच.लक्ष्मण आनवने,भाजपा युवा नेते हनुमान चालक,प्रशांत वालके,सिद्धेस्वर क्षीरसागर,पंडित लांडे,अशोक माने,सुकदेव शिंदे,शिवा माने,संजय जवादे.काशीनाथ लांडे,बालुमहाराज लांडे.गमनदीप वंजारे,आदि ग्रामस्त उपस्थित होते.

## सदगुरूच योग्य मार्ग दाखवून

माध्यमातून गुरू हा एकमेव असा दीपस्तंभ आहे, ज्यो अज्ञानातून ज्ञानाकडे वाट दाखवतो, असे ठामपणे सांगितले. यावेळी अनेक भाविकांना त्यांच्या प्रवचनातून नवचैतन्य व सकारात्मक प्रेरणा मिळाल्याचे जाणवले. परळी येथील हालगे गार्डन येथे आज रविवार दि.१३ जुलै रोजी दिव्य ज्योति जाग्रति संस्थानच्या वतीने आयोजित गुरू पोर्णिमा उत्सव २०२५ प्रसंगी प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपापात्र शिष्या सुश्री पद्महस्ता भारतीजी बोलत होत्या. कार्यक्रमस्थळ भक्तांनी आकर्षकरित्या सजविल्याने आनंदी व भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. परिसरात रांगोळी काढून आणि सुशोभिकरण केल्याने वातावरण प्रसन्न दिसत होते. प्रवेशद्वारालाच प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांचे आकर्षक स्वरूप एका सुंदर मंदिरात दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. या मंदिरापुढेही आकर्षकरित्या काढलेली रांगोळी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. सत्संग परिसरात विविध साहित्याचे स्टॉल लावले होते. आपल्या सत्संग कार्यक्रमातून सुश्री पद्महस्ता भारतीजीनी गुरू कोण असावा ? यापासून शिष्यापर्यंतची संपूर्ण व्याख्या अतिशय सहजतेने व विविध उदाहरणासह स्पष्ट केले. ते म्हणाले की, गुरू सेवा ही सर्वश्रेष्ठ असून ही सेवा श्री हनुमंतासारखी पारदर्शक असावी. श्रीराम व हनुमान यांचे संदर्भ उदाहरण देवून सुश्री पद्महस्ता भारतीजी पुढे म्हणाल्या की, गुरू हा बुद्धीचा राजा असून गुरू व शिष्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. जीवन जगत असतांना आपणास अनेक अडचणी येत असतात. परंतू या अडचणीतूनही सदाचाराचा मार्ग दाखविण्याचे काम आपले गुरू नकळतपणे करीत असतात त्याकरीता गुरूवर विश्वास असणे अत्यंत आवश्यक असून अनेकदा गुरू शिष्याची परिक्षा घेतो तेंव्हा शिष्याने त्या प्रसंगाला तन्मयतेने तोंड दिले पाहिजे असे सुश्री पद्महस्ता भारतीजी म्हणाल्या. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, भारत हा गुरू परंपरेवर विश्वास ठेवणारा, त्यांना मानणारा असून गुरू-शिष्य परंपरेतूनच विश्वात्मक कल्याण साध्य होते. अर्थातच श्रद्धा, विश्वास, विनम्रता व शालीनता शिष्यात असणे आवश्यक असून अशा सदाचारी व्यक्तीला गुरूवर्य योग्य मार्ग दाखवून त्याचे कल्याण करतात असे विचार प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपापात्र शिष्या सुश्री पद्महस्ता भारतीजी यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित साधक व भक्त टाळयांच्या गजरामध्ये भजनात सहभागी झाले होते. परळीसह अंबाजोगाई, सोनपेठ, गंगाखेड, नांदेड, सिरसाळा,माजलगाव, कळंब, केज, लातूर आदी ठिकाणाहून भाविकांची अलोट गर्दी या सत्संग सोहळयास लाभली होती. गुरूपोर्णिमेच्या या कार्यक्रमामुळे परळी शहरात धार्मिकतेचे भरगच्च वातावरण दिसून येत होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिव्य ज्योति जागृती संस्थानच्या परळी शाखेच्या सर्व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमातून उपस्थित भाविकांनी अध्यात्मिक समाधान व गुरूसेवेचा प्रसाद घेवून आनंद व्यक्त केला.

## 'जनसुरक्षा नव्हे

आणि उपमुख्यमंत्री यांच्यासाठी मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून सादर करण्यात आले.

निदर्शनात शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक कॉम्रेड.नामदेव चव्हाण, आयटक नेते,माजी

पान १/४ वरून

सैनिक अशोक येडे बीड जिल्हाध्यक्ष (आप), रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष (इंटक), डी .जी.तांदळे अध्यक्ष किसानसभा महाराष्ट्र राज्य,कॉम्रेड. भाऊराव प्रभाळे, बीड जिल्हा सचिव भारतीय कम्युनिस्ट पक्ष, जगन्नाथ बहीर, मराठवाडा शिक्षक नेते, कॉम्रेड बी.एस. दहिवडे, सखाराम बेगडे बीड जिल्हा सचिव (इंटक), कॉम्रेड. व्ही.एन.सवासे आदी सहभागी होते.

विधेयकावर ठाम आक्षेप

डॉ. ढवळे म्हणाले की, ''हे विधेयक राजकीय हेतूने प्रेरित असून सरकारला जाब विचारणाऱ्या कार्यकर्ते, पत्रकार व संघटनांचे तोंड बंद करण्याचे साधन आहे. संशयावरून कोणालाही अटक, संघटना बेकायदेशीर ठरवणे, मालमत्ता जप्ती, बँक खाती गोठवणे यांसारख्या अमर्याद अधिकारांची तरतूद या विधेयकात आहे.''

जनसुनावणीशिवाय पारित करण्यात आलेल्या या विधेयकावर १२ हजारांहून अधिक नागरिक व संघटनांनी आक्षेप नोंदवले असून, 'नक्षलवाद' या शब्दाचा स्पष्ट उल्लेख नसतानाही 'कडव्या डाव्या विचारसरणी' या संज्ञेच्या आधारे कार्यकर्त्यांवर कारवाईचा धोका निर्माण झाल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

लोकशाहीच्या रक्षणासाठी मागणी विधेयक तातडीने रद्द करा

''हे जनसुरक्षा नव्हे तर जनमुस्कटदाबी विधेयक आहे. लोकशाहीत आंदोलन व प्रश्न विचारण्याचा अधिकार मूलभूत आहे. या विधेयकाचा गैरवापर होण्याची शक्यता लक्षात घेता ते तातडीने रद्द करण्यात यावे,'' अशी ठाम मागणी आंदोलक कार्यकर्त्यांनी केली.

## यावर्षी वाढदिवस सोहळा

दुबार पेरणीचे संकट आहे, दुसरीकडे नुकतेच जवळचे सहकारी स्व. आर. टी. देशमुख यांचे झालेले निधन आदी बाबींचा विचार करून धनंजय मुंडे यांनी वाढदिवस साजरा करणार नसून, सहकारी - कार्यकर्त्यांनी बॅनर बाजी, जाहिराती आदिंवरील खर्च टाळून त्याऐवजी सामाजिक उपक्रम राबवावेत, असे आवाहन केले आहे.

धनंजय मुंडे यांना काही दिवसांपूर्वी बेल्स पाल्सी या आजाराचे निदान झाले होते. त्यानंतर विविध उपचार घेऊन मुंडेंनी इगतपुरी येथील ध्यान केंद्रात विपश्यना देखील केली. आ. धनंजय मुंडे हे येत्या १५ जुलै रोजी ध्यानसाधना करणार असून, ते वाढदिवसाच्या दिवशी शुभेच्छा स्वीकारण्यास परळी वैद्यनाथ किंवा मुंबई वा अन्य कुठेही उपलब्ध असणार नाहीत, असे त्यांच्या कार्यालयाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

## वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीसाठी

तसेच शिवसेना शिंदे गटाकडून देखील अर्ज दाखल करण्यात आला आहे. वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी १० ऑगस्टला मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. बँकेच्या निवडणुकीसाठी पहिल्यांदाच यशश्री मुंडे निवडणुकीच्या रिंगणात असणार आहे. आज अर्ज छाननी प्रक्रिया पार पडली. ज्यात यशश्री आणि प्रीतम मुंडे या दोघींचाही अर्ज वैध ठरला आहे.

मुंडे बहिण भाऊ एकत्र आल्यानंतर वैद्यनाथ बँकेची ही पहिलीच निवडणूक

पुढे आलेल्या माहितीनुसार, वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या १७ जागांसाठी निवडणूक होत असून ७१ अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज छाननी प्रक्रियेसाठी संचालक मंडळ बीडमध्ये उपस्थित राहिले. दरम्यान मुंडे बहिण भाऊ एकत्र आल्यानंतर वैद्यनाथ बँकेची ही पहिलीच निवडणूक पार पडत आहे. ज्या निवडणुकीत दोघेही मुंडे बहीण भाऊ एकत्र आले आहे. तर या निवडणुकीसाठी शिंदे गटाकडून एक अर्ज दाखल करण्यात आला, जो अर्ज वैध ठरला. वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीसाठी मुंडे बहीण भावांनी विचारात घेतले नाही. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने अर्ज दाखल केल्याचं उमेदवाराने सांगितले आहे.

यशश्री मुंडेंच विदेशातून वकिलीचे शिक्षण

आधी या बँकेत स्वतः दिवंगत गोपीनाथ मुंडे आणि प्रीतम मुंडे


# राज्यातील न्यायसहायक प्रयोगशाळा बळकट करण्यासाठी लोकाभिमुख व ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर : महाराष्ट्रात देशातील सर्वात अत्याधुनिक सायबर न्यायसहायक वैज्ञानिक व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. आधुनिक सायबर प्रयोगशाळांसह मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारल्या जात आहेत. तंत्रज्ञान, सायबर आणि फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेता येत्या काळात लोकाभिमुख व ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करुन न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था अधिक मजबूत करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. येथील धंतोली परिसरात प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन आणि गृह विभागाच्या तीन नवीन प्रकल्पांचे ऑनलाईन लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार संदीप जोशी आणि संजय मेश्राम, महासंचालक (न्यायिक व तांत्रिक) संजय वर्मा, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी आणि न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाचे संचालक डॉ. विजय ठाकरे यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गुन्ह्यांची सिद्धता होऊन गुन्हेगारास शासन व पिडीतांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची भूमिका महत्त्वाची ठरते. नवीन भारतीय फौजदारी कायद्यांनी न्यायसहायक पुराव्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे तसेच विवक्षित गुन्ह्यांमध्येही यास अनिवार्यता प्राप्त झाली आहे. राज्यात गुन्हे सिद्धतेचे प्रमाण वाढविण्यासाठी २०१४ नंतर विशेष प्रयत्न झाले असून वैविध्यपूर्ण पद्धतीचा अवलंब, तांत्रिक पुरावे आणि न्यायसहायक वैज्ञानिक पुराव्यांवर भर देण्यात आला व १४ शासन निर्णय काढून गुन्हे सिद्धतेचे प्रमाण ९ वरुन ५४ टक्क्यांवर आणले. विकसित भारताच्या दिशेने मार्गक्रमण करतांना गुन्हे सिद्धतेचे हे प्रमाण ९० टक्क्यांपुढे घेऊन जावे लागेल, असेही त्यांनी सांगितले. राज्यात आधुनिक सायबर न्यायसहायक प्रयोगशाळा, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि नवी मुंबई येथे सायबर केंद्र उभारुन त्याचे महामंडळात रुपांतर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर येथील प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा ही अत्याधुनिक करण्याच्या दिशेने पावले टाकण्यात आली. या प्रयोगशाळेच्या इमारतीचे भूमिपूजन ही एक समाधानाची बाब असून फेब्रुवारी २०२७ पर्यंत या इमारतीचे बांधकाम पूर्ण व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांच्या कामांमध्ये लोकाभिमुखता व ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. यामुळे वेळेत गुन्ह्यांची सिद्धता होऊन न्यायदानास गती येईल. न्यायसहायक वैज्ञानिक व्यवस्था हे एक लोकसेवेचे कार्य असून या वर्षाअखेर प्रलंबित असलेले सर्व प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

## वंचित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती समितीचे अध्यक्षपदी पुरुषोत्तम वीर तर सचिवपदी मिलिंद सरपते यांची निवड

बीड : बीड शहर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने लोकशाहीर आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली असून, शासकीय विश्रामगृह बीड बैठकी मध्ये पुरुषोत्तम वीर यांची अध्यक्षपदी आणि मिलिंद सरपते यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे. सहसचिवपदी संदीप जाधव, कोषाध्यक्षपदी रोहन मगर आणि सदस्य म्हणून आकाश साबळे, युनुस भाई, राजकुमार जोगदंड यांची निवड झाली आहे. पाशा भाई यांना उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.



जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि शहराध्यक्ष लखन जोगदंड व तालुकाध्यक्ष किरण वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही समिती कामकाज करत आहे. या समितीद्वारे वंचित, बहुजन आणि शोषित समाजासाठी योगदान देणाऱ्या अण्णाभाऊ साठेंच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्याचा प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जातील. पुरुषोत्तम वीर यांनी यावेळी सांगितले की, ''अण्णाभाऊ साठे हे वंचित समाजासाठी आदर्श व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या कार्याची जयंती उत्सव समितीद्वारे समाजापर्यंत पोहोचविणे हा आमचा उद्देश आहे.'' मिलिंद सरपते यांनीही सांगितले की, ''लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या अभंगांनी आणि साहित्याने समाजाला एकत्र करण्याचे काम केले आहे. त्यांच्या जयंती उत्सवातून त्यांच्या विचारांचा आणि संदेशाचा प्रसार व्हावा, यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.''

या उत्सवाद्वारे समाजातील शोषित घटकांना सशक्त करण्यासाठी आणि सामाजिक समरसतेसाठी काम करण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला आहे. लवकरच या जयंती उत्सवाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित होणार आहेत.

## रवींद्र मालुसरे यांना श्री शिवाजी ज्ञानपीठ (इंटरनॅशनल) संस्थेचा शिवकार्यासाठी पुरस्कार

बीड : श्री शिवाजी ज्ञानपीठ (इंटरनॅशनल) ही संस्था छत्रपती शिवाजी महाराजांचे सिद्धांत ठेऊन सामाजिक कार्य करणाऱ्यांचा सत्कार करते. संस्थेच्या वतीने २०२५ सालासाठी देण्यात येणाऱ्या वीर तानाजी मालुसरे पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार रवींद्र मालुसरे यांची निवड केली आहे. दादर येथील श्री शिवाजी मंदिर येथे १५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

संस्थेच्या वतीने यापूर्वी श्री. संभाजी राजे छत्रपती, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. सदाशिव शिवदे, प्रो. मोहन आपटे, श्री. पांडुरंग बलकवडे, श्री. प्रमोद मांडे, श्री. पी. आर. मुंडले, प्रा. पी. के. घाणेकर, डॉ. जयसिंगराव पवार, श्री. सुनील पवार व डॉ. सुचित्रा ताजणे यांना पुरस्काराने तर महावीरचक्र प्राप्त कॅप्टन मोहन ना. सामंत, शौर्य चक्र व सेना मेडल प्राप्त भा. नौ. निवृत्त ले. कर्नल तुषार जोशी, निवृत्त लेफ्ट. कर्नल एस. एस. हेरवाडकर, निवृत्त मेजर अनिल माटवणकर, निवृत कॅप्टन प्रफुल तावडे यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविले आहे. रवींद्र मालुसरे यांना यापूर्वी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ मुंबई, नगरमित्र पुरस्कार, डॉ बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप दिल्ली सन्मान पुरस्कार इत्यादींनी गौरविले आहे. मालुसरे हे मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष असून पोलादपूर अस्मिता या वाचनीय ब्लॉगचे मुख्य संपादक आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडावर त्यांचा अभ्यास असून यावर त्यांनी विविध दैनिकांनातून विपुल लेखन केले आहे. याशिवाय शिवकार्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी होणाऱ्या अनेक संस्थांच्या उपक्रमात सक्रिय सहभागी होत असतात. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आणि विचार यांचा अभ्यास करण्यासाठी श्री शिवाजी ज्ञानपीठ (इंटरनॅशनल) ची स्थापना डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी केली आहे.

## सलग चौथ्यांदा सोने महाग टेरिफचा दबाव सोन्यात कायम

मुंबई : आजही सलग चौथ्यांदा सोन्यात मोठी वाढ झाली आहे. प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापारातील दबावामुळे सोन्यासह कमोडिटी बाजारातही अस्थिरता कायम आहे. युएसने काल युरोपियन युनियनवर परवा उशीरा ३०% कर, मेक्सिकोवर ३०% कर, कॅनडावर ३५% कर लादल्याने आंतरराष्ट्रीय व्यापारासह सप्लाय चेन यंत्रणेवर दबाव तीव्र झाला. परिणामी आज सोन्याच्या आंतरराष्ट्रीय दरात वाढ झाली आहे. गुडरिटर्न्स संकेतस्थळावरील माहितीनुसार, आज सराफा बाजारात २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात १७ रुपयांनी वाढ घेत दर ९९८८ रूपये प्रति ग्रॅम दर सुरू आहे. २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात १५ रूपयांनी वाढ झाल्याने दर ९१५५ रूपये प्रति ग्रॅम दर सुरू आहे. १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात १२ रूपयांनी वाढ झाल्याने प्रति ग्रॅम दर ७४९१ रूप यांवर पोहोचला आहे. याशिवाय संकेतस्थळावरील माहितीनुसार, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति तोळा किंमतीत १७० रूपयांची वाढ झाल्याने सोन्याचे दर ९९८८० रूपयांवर गेली आहे. २२ कॅरेट सोन्याच्या प्रति तोळा किंमतीत १५० रूपयांनी वाढ झाल्याने दर पातळी ९१५५० रूपयांवर पोहो चली. १८ कॅरेट सोन्याच्या प्रति तोळा किंमतीत १२० रूपयांनी वाढ झाल्याने दर पातळी ७४९१० रूपयांवर पोहोचली आहे. आज आंतरराष्ट्रीय सोन्याच्या गोल्ड फ्युचर निर्देशांक यामध्ये सकाळी ०.२६% वाढ झाली आहे. युएस गोल्ड स्पॉट दरात ०.१०% वाढ झाल्याने स्पॉट दर ०.११% वाढ झाल्याने प्रति डॉलर सोन्याची किंमत ०.२१% वाढत ३३६२ औंसवर गेली आहे. भारतीय कमोडिटी बाजारातील एमसीएक्स ( ) निर्देशांकात ०.३४% वाढ झाल्याने एमसीए क्समध्ये सोन्याची दर पातळी ९८१५४ रूपयांवर गेली आहे. भारतातील मुंबई पुण्यासह सर्व प्रमुख शहरात २४ कॅरेट सोन्याचा प्रति ग्रॅम दर ९९८८ रूपये,२२ कॅरेट सोन्याचा दर प्रति ग्रॅम किंमत ९१५५ रूपयांवर, १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दर पातळी ७४९१ रू पयांवर पोहोचला आहे. उद्या युएसमध्ये ग्राहक किंमत निर्देशांक जाहीर होणार आहे. याआधारावर सोन्याची पुढील पातळी निश्चित होऊ शकते. जागतिक वातावरणातील सुरक्षित गुंतवणूकीचा पर्याय म्हणून सोन्याचे महत्व वाढल्याने किंमतीत सातत्याने वाढ होत आहे. अमेरिकेतील तज्ञांच्या मते उद्या जाहीर होणाऱ्या सीपीआयमध्ये ०.२३% घट होऊ शकते व कोर किंमत ०.३०% कमी होऊ शकते. तसे झाल्यास फेडरल रिझर्व्ह व्याजदरात कपात होण्याची शक्यता प्रबळ होऊ शकते जेणेकरून आगामी काळाती ल सोन्यावरील दबाव कमी होऊ शकतो.

## आज ह.भ.प मोहन महाराज खरमाटे यांची प्रवचन सेवा

बीड प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वतज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होणार असून, या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक १४/७/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत जेष्ठ कीर्तनकार ह भ प मोहन महाराज खरमाटे याची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणारअसून या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाच लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे....



## पैठणच्या उजव्या कालव्यातुन शेती सिंचनासाठी तात्काळ पाणी सोडा - बळीराम सोंळके

गंगावाडी प्रतिनिधी

पैठणच्या उजव्या कालव्यातुन शेती सिंचनाला पाणी सोडण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण मे महिण्यात बरसलेल्या पावसाने सध्या दडी मारली असल्याने खरिप पिके करपुन जात असल्याची परिस्थिती निर्माण झाली असल्याने पाणी सोडण्याची मागणी भारतीय किसान संघाचे प्रांत अध्यक्ष बळीराम सोळंके यांनी कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र. ३ बीड यांच्याकडे केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पैठणच्या उजव्या कालव्याच्या कार्यक्षेत्रात गेली वीस-पंचवीस दिवसापासून मोठा पाऊस पडला नाह. परिणामी सध्या दुष्काळजन्य परिस्थिती



निर्माण झाली आहे. उभी खरीप पिके सुकू लागली आहेत. त्याचबरोबर शेतकऱ्यांनी देखील सब डिव्हिजन कडे तसेच कार्यक्षेत्रातील लोकांनी आपापल्या कॅनल इन्स्पेक्टर व कनिष्ठ अभियंता यांच्याकडे तात्काळ मागणी करावी जेणेकरून लवकरात लवकर पाणी सुटेल व खरीप पिकांना दिलासा मिळेल. अन्यथा हातची पिके जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. धरण प्रशासनाने या सर्व बाबींचा विचार करून पैठणच्या उजव्या कालव्यास तात्काळ पाणी सोडावे अशी मागणी भारतीय किसान संघाचे प्रांत अध्यक्ष बळीराम सोळंके यांनी केली आहे.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची थेट कर्ज योजना

बीड : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाकडून (मर्या.) सन २०२५-२६ वर्षात थेट कर्ज योजना राबवण्यात येत आहे. जिल्ह्यातील मातंग समाजातील अंतर्भूत १२ पोटजातींच्या पात्र इच्छुकांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक प्रणिता बोराडे (सरपते) यांनी केले आहे. महामंडळमार्फत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनेंतर्गत, मोबाईल रिपेअरिंग, इलेक्ट्रॉनिक वस्तू दुरुस्ती, फॅब्रिकेशन, ब्युटीपार्लर, टेलरिंग, फूड प्रोसेसिंग, किराणा दुकान, प्रिंटींग, कॅटरिंग सेवा, हॉटेलिंग, खेळ साहित्य विक्री, रेडीमेड कपड्यांचे दुकान अशा विविध लघु व्यवसायांसाठी कर्ज प्रकरणे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे सकाळी १० ते सायंकाळी ६.१५ (सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारली जात आहेत. स्वत: अर्जदाराने मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहून कर्ज प्रस्ताव दोन प्रतीत सादर करावा. त्रयस्थ, मध्यस्थांमार्फत कर्ज प्रकरण स्वीकारण्यात येणार नाही.

अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे. वार्षिक उत्पन्न □ तीन लाखांपेक्षा अधिक नसावे. महामंडळाच्या योजनेचा पूर्वी लाभ घेतलेला नसावा, अशी अर्हता आहे. जात व उत्पन्न प्रमाणपत्र, रेशन व आधार कार्ड, पॅन कार्ड, दोन पासपोर्ट फोटो, व्यवसायाचे दरपत्रक, जागेचे पुरावे, ना-हरकत प्रमाणपत्र किंवा शॉप ॲक्ट, अनुभव व शैक्षणिक प्रमाणपत्रे, सिबिल क्रेडिट स्कोअर (५००), आधार संलग्न बँक खाते तपशील व स्व-स्वाक्षरीत प्रत, महामंडळाच्या विहित नमुन्यातील झेरॉक्स हस्तलिखित, टंकलिखित केलेला अर्ज (महामंडळाच्या कार्यालयात विनामुल्य उपलब्ध) व इतर अनुषंगिक कागदपत्रे प्रस्तावासोबत असावीत, असेही श्रीमती बोराडे यांनी कळवले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी महामंडळाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी आवाहन केले आहे.

## संत श्रेष्ठ सावता महाराज समाधी महोत्सवाची जय्यत तयारी; १७ जुलैपासून ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात

परळी / प्रतिनिधी

येथील श्री संत सावता महाराज मंदिरात प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी १७ ते २४ जुलै दरम्यान श्री संत श्रेष्ठ शिरोमण सावता महाराज समाधी महोत्सव व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ खंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या सात दिवस चालणाऱ्या सप्ताहात महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार गायक व मृदंग वादक तसेच भारूड असे विविध धार्मिक कार्यक्रमा सोबतच कलावंत आपली कला भारुडाच्या माध्यमातून सादर करणार असून या निमित्त रक्तदान तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कार आधी सामाजिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या सप्ताहातील कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान श्री संत श्रेष्ठ सावता माळी सेवा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. परळी शहरातील जुने गावभागात असलेल्या संतश्रेष्ठ सावता महाराज मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी १७ ते २४ जुलै दरम्यान संतश्रेष्ठ सावता महाराज पुण्यतिथी समाधी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या निमित्त महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार यांचे दररोज सायंकाळी ७ ते ९ हरिकीर्तन आयोजित करण्यात आले असून सप्ताहाच्या पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा ह भ प वेदांताचार्य शिरसागर महाराज उखळीकर तर दिनांक १८ जुलै रोजी ह भ प भागवताचार्य डॉक्टर विठ्ठल महाराज वासुदेव चौरे पंढरपूर, दिनांक १९ जुलै रोजी ह भ प भागवताचार्य तुकाराम महाराज मुंडे शास्त्री टोकवाडी दिनांक २० जुलै रोजी ह भ प भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज उखळीकर परळी २१ जुलै रोजी ह भ प वेदांताचार्य जगन्नाथ महाराज देशमुख श्रीक्षेत्र पंढरपूर दिनांक २२ जुलै रोजी ह भ प राष्ट्रीय कीर्तनकार रामकृष्ण महाराज रंधवे बापू पाटोदा २३ जुलै रोजी ह भ प प्राचार्य योगीराज महाराज गोसावी श्रीक्षेत्र पैठण २४ जुलै रोजी ह भ प भागवताचार्य विठ्ठल महाराज उखळीकर यांचे सकाळी दहा ते बारा यादरम्यान काल्याचे किर्तन आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर गुरुवार दिनांक २४ रोजी दुपारी परळी शहरातून भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे त्यानंतर सायंकाळी पाच नंतर महाप्रसादाचे आयोजन श्री संत सावता महाराज मंदिर येथे करण्यात आले आहे दरम्यान सात दिवस चालणाऱ्या या सप्ताहात महाराष्ट्रातील कीर्तनकार टाळ मृदंग तसेच गायनाचार्य व भारुड कर असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या सप्ताहातील विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री संत श्रेष्ठ सावता माळी सेवा समाज परळी वैजनाथ यांच्यावतीने करण्यात आले आहे.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे




सायं.दैनिक
बीड
# प्रारंभ
4
सोमवार दि.१४ जुलै २०२५




# मंत्री पंकजा मुंडेंच्या निर्णयामुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांभोवतीचा गळफास घट्ट होणार!

## शेतकरी संघटनेचे कालिदास आपेट यांनी व्यक्त केली भीती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

गायी, बैल, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, वराह पालन आदी. पशुपालनाच्या व्यवसायाला कृषीचा दर्जा दिल्याने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या भोवतीचा गळफास आणखी आवडला जाणार आहे.अशी भिती शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष, कालिदास आपेट यांनी व्यक्त केली.

शेतीमालाची खरेदी विक्री करण्यासाठी ३०५ बाजार समित्या आणि सुमारे ८५० उपबाजार अस्तित्वात आहेत. बाजार समितीच्या कायद्यातील कलम (३२-ड) नुसार बाजार समितीच्या आवारात आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने शेतीमालाची खरेदी विक्री करणे



कायद्याने गुन्हा आहे. तरीही भात,ज्वारी,बाजरी, मका, गहू, हरभरा,करडी, भुईमूग,जवस, नाचणी, सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग आदी. आधारभूत किंमतीचे संरक्षण असलेल्या पिकांना बाजार समितीचा कायदा अस्तित्वात आल्यापासून बाजार समितीच्या आवारात आधारभूत किंमत मिळालेली नाही. बाजार समितीचा कायदा उघडपणे पायदळी तुडविणाऱ्या महाराष्ट्रातील एकाही बाजार समितीवर आजतागायत कसलीही कारवाई झालेली नाही. ऊसदरासाठी चा कायदा अस्तित्वात आहे.उसाचे पैसे बुडविणाऱ्या कुठल्याही साखर कारखान्यावर अजूनपर्यंत कसलीही कारवाई झालेली नाही. गायी,बैल, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या,अंडे, दूध खुलेपणाने बाजारात विकता येत होते. कृषीचा दर्जा दिल्यानंतर बाजाराबाहेर विकणारा दुध, भाजीपाला, फळे आणि शेतीमाल बाजार समितीच्या आवारातचं विकावा लागणार का? या प्रश्नाचा खुलासा पंकजा मुंडे यांनी केलेला नाही.

पंकजा मुंडे ग्रामीण विकास मंत्री असताना सन २०१६ साली देवेंद्र फडणवीस सरकारने गोवंश हत्या बंदी कायदा ▶▶ पान २ वर...

# दत्त संस्थान बालाघाट येथे गुरु पौर्णिमा उत्सव व गुरू पूजन




**बीड । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र कपिलधार पासून जवळच असलेल्या श्री.दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने व दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बालाघाट डोंगर परिसरात श्री दत्त संस्थान कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे गुरुवार दि. १० / ०७/ २०२५ रोजी गुरु पौर्णिमा उत्सव व गुरू पूजन सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. गुरु पौर्णिमा उत्सव व गुरू पूजन दत्त उपासक शिंदे महाराज यांनी केले. दुपारी श्री दत्त महाराज व भोले शिवशंकर यांना दुग्ध अभिषेक करून गुरूची पाद्य पूजा केली. रात्री शिवाजी नगर उदंड वडगाव येथील भजनी मंडळाचा संगीत भजनाचा कार्यक्रम झाला.

# राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या बीड जिल्हा युवक कार्याध्यक्ष पदी ॲड.प्रशांत पवार यांची नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

आगामी नगरपंचायत, नगरपालिका,जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या होणाऱ्या निवडणुका लक्षात घेता सर्व पक्षाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.त्यात बीड जिल्ह्यात युवकांचे मोठे संघटन असणारे ॲड.प्रशांत पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बीड जिल्हा कार्याध्यक्ष पदी युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांनी नियुक्ती करत जिल्ह्यात युवकांचे मोठे संघटन उभा केले आहे.



ॲड.प्रशांत पवार यांनी लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये निष्ठावंत म्हणून उल्लेखनीय काम केल्याबद्दल त्यांच्या कामाची पावती म्हणून तसेच युवकांचे संघटन व तालुक्यातील युवकांची मोठी बांधणी ▶▶ पान २ वर...

# अतुल गायकवाड यांना समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर-युनूस

बीड । प्रतिनिधी

अतुल गायकवाड यांना समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार बी. एस. एफ बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोहळा अमरावती जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात होणार असून चित्रपट क्षेत्रातील प्रसिद्ध अभिनेता, अभिनेत्री, दिग्दर्शक, मॉडेल्स यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून कला, पत्रकारिता, समाजसेवा, साहित्य, कृषी अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या लोकांना हा समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे.अशी माहिती संस्थेच्या शितल गजभिये यांनी दिली.



# शांताई अर्बन तर्फे साहित्य वाटप, वृक्षारोपण आणि विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

बीड । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली शांताई अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. बीड यांच्या वतीने सामाजिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले.

रविवार, दिनांक १३ जुलै २०२५ रोजी तपोभूमी वाघदरा ब्रह्मपूर, ईमामपूर येथील आश्रमात हे उपक्रम पार पडले. आश्रमातील ५२ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व ब्लड टेस्ट करण्यात आली. यामध्ये त्यांचे ब्लड ग्रुप तपासून देण्यात आले. त्याचप्रमाणे शालेय साहित्य वाटप, परिसराच्या हरित विकासासाठी वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला आणि सार्वजनिक आश्रमा साठी आवशक असणाऱ्या बाकड्यांचे वाटप करून समाजाभिमुख कार्य करण्यात आले. ▶▶ पान २ वर...




# शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते हॉटेल विराजचे उद्घाटन संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे मोरेवाडी येथे युवासेना वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथजी मोरे,युवानेते राजेश नाना मोरे व युवानेते लक्ष्मण (जिजा) मोरे, यांच्या हॉटेल विराज चे भव्य उद्घाटन शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते संपन्न झाले..

यावेळी सरांनी त्यांचे अभिनंदन करत सर्व मोरे परिवारास शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवसेनेचे वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे, ज्येष्ठ नेते वचिष्ठ आण्णा



मोरे, शिवसेनेचे जिल्हा सहसचिव युवराज मामा शिंदे, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख वचिष्ठ नाना शेंडगे,शहर प्रमुख शिवाजीराव दुटाळ, राजेश नाना मोरे,बाबासाहेबजी राऊत, केसापुरीचे माजी सरपंच जगन्नाथजी कवचट,मैंदा पोखरीचे माजी सरपंच चंद्रकांतजी करांडे, डॉक्टर अवारे साहेब,डॉक्टर आंधळे साहेब, उद्योजक सुंदरजी शेवाळे, महादेव दाजी बोंद्रे, सनराईज इंग्लिश स्कूल पिंपळनेर चे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर सातपुते सर,युवानेते अश्विनजी लांडे,जिजाभाऊ चिंचकर,राजेंद्र सातपुते, शंकर वीर, सुरेश खडुळ,ज्ञानेश्वर बोंद्रे,अविनाश बोंद्रे,चंद्रकांतजी करांडे,तुकाराम गायकवाड सह सर्व उपस्थित होते.

# श्री क्षेत्र चाकरवाडी येथे ह.भ.प महादेव महाराज यांच्या हस्ते वृक्षारोपण करून ना पंकजाताईंना दीर्घायुष्या मिळो ही प्रार्थना माऊली चरणी केली गणेश लांडे

**चाकरवाडी येथील महिना वारी मध्ये प्लास्टिक मुक्ती व्हावी याकरिता कापडी पिशव्यांचे वाटप**

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व हवामान बदल मंत्री नामदार पंकजाताई मुंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपाचे युवा नेते गणेश लांडे यांच्या मार्फत सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे यामध्ये त्यांनी दिनांक १४ रोजी श्रीक्षेत्र चाकरवाडी येथील



माऊली मंदिर प्रांगणामध्ये ह भ प श्री महादेव महाराज यांच्या हस्ते वृक्षांची लागवड करून नामदार पंकजाताई यांना दीर्घायुष्य मिळो ही मनोकामना माऊली चरणी व्यक्त केली आहे.

येणाऱ्या काळामध्ये भावीक भक्तांना सावलीची व्यवस्था व्हावी व प्रचंड प्रमाणामध्ये होत असलेल्या वृक्षतोडीमुळे निसर्गाचा बिघडत चाललेला समतोल राखला जावा ही भावना मनात ठेऊन श्री गणेश लांडे यांनी चाकरवाडी या ठिकाणी ▶▶ पान २ वर...

# जानकीच्या आनंदाला दिव्यांग, वृद्धांच्या आशिर्वादाची किनार

## पोखरकर परिवाराची बांधिलकी ; दिव्यांग, वृध्दांना दिले व्हिलचेअर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील पोखरकर परिवाराकडून पुन्हा एकदा बांधिलकी जोपासत दिव्यांग, वृध्दांना दिले व्हिलचेअर देण्यात आले. जानकी राजेंद्र पोखरकर हिचे अभिष्टचिंतन करीत जानकीच्या आनंदाला लाभली दिव्यांग, वृद्धांच्या आशिर्वादाची किनार लाभली.

हल्लीच्या काळात वाढदिवस साजरा करताना विविध गोष्टींवर भरमसाठ



खर्च केला जातो. मात्र, या गोष्टींपेक्षा सामाजिक जाणीव ठेवत, समाजासाठी काहीतरी चांगले करून वाढदिवस साजरा करणे अधिक अर्थपूर्ण ठरते. येथील राजेंद्र पोखरकर यांनी त्यांची कन्या जानकी हिच्या ४ थ्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, दिनांक ११ जुलै रोजी वयोवृद्ध, दिव्यांगांना ▶▶ पान २ वर...

# ओंकारेश्वर महादेव मंदिरात पुनःप्राणप्रतिष्ठा, नंदी स्थापना व कलशारोहन सोहळा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बलभिम नगर पेठ येथील विरशैव कॉलनीमधील जागृत व पावन देवस्थान श्री ओंकारेश्वर महादेव मंदिरात पुनः प्राणप्रतिष्ठा, नंदी स्थापना व कलशारोहन सोहळा मोठ्या भक्तिभावात संपन्न होणार आहे. हा भव्य धार्मिक सोहळा शुक्रवार १८ जुलै २०२५ रोजी सकाळी १०:१७ वाजता या स्थिर मुहूर्तावर संपन्न होणार आहे. या पावन प्रसंगी श्रीगुरु ष. ब्र.१०८ विरुपाक्ष शिवाचार्य महाराज (मठाधिपती, जहागिरदार मठ संस्थान, मानुर) व ह.भ.प. महादेव महादेव महाराज (श्रीक्षेत्र चाकरवाडी) यांच्या हस्ते विधीवत प्राणप्रतिष्ठा, आशिर्वचन व महापूजन होणार आहे. यानंतर महामंगल आरती व दुपारी १ ते ४या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्याअंतर्गत १६ जुलै रोजी बुधवारच्या दिवशी दुपारी ४ वाजता भव्य देव मिरवणूक काढण्यात येणार असून ती श्रीदत्त प्रसादालय, काळा हनुमान ठाणा, महावीर चौक, श्री तुळजाभवानी चौक मार्गे मंदिरात येणार आहे. १७ जुलै गुरुवारी विविध धार्मिक विधी जसे की पुण्याहवाचन, प्रधान पीठ हवन, जलाधिवास, धान्यादी वास, वस्त्र वास, शयन वास इत्यादी पार पडणार आहेत. या संपूर्ण धार्मिक महोत्सवाचे आयोजन श्री ओंकारेश्वर महादेव मंदिर भक्त परिवार, वत्तारवेस, विरशैव कॉलनी, बलभिम नगर, पेठ बीड यांच्या वतीने करण्यात आले असून, सर्व भाविक व श्रद्धाळूंनी यामध्ये सहभागी व्हावे व अध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती समितीच्या अध्यक्षपदी पुरुषोत्तम वीर तर सचिवपदी मिलिंद सरपते

बीड । प्रतिनिधी

शहर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने लोकशाहीर आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली असून, शासकीय विश्रामगृह बीड बैठकी मध्ये पुरुषोत्तम वीर यांची अध्यक्षपदी आणि मिलिंद सरपते यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे. सहसचिवपदी संदीप जाधव, कोषाध्यक्षपदी रोहन मगर आणि सदस्य म्हणून आकाश साबळे, युनुस भाई, राजकुमार जोगदंड यांची निवड झाली आहे. पाशा भाई यांना



उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि शहराध्यक्ष लखन जोगदंड व तालुकाध्यक्ष किरण वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही समिती कामकाज करत आहे. या समितीद्वारे वंचित, बहुजन आणि शोषित समाजासाठी योगदान देणाऱ्या अण्णाभाऊ साठेंच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्याचा प्रसार करण्यासाठी ▶▶ पान २ वर...

# जिल्हाधिकाऱ्यांनी बँकांना पीक विमा भरण्याच्या सूचना द्याव्यात-भाई थावरे

## पीक विमा भरण्यासाठी शेतकरी जिल्हाधिकाऱ्यांची गाडी अडविणार

**माजलगाव । प्रतिनिधी**

**दरवर्षी जुलैच्या पहिल्या आठवड्यात शासनाकडून पीक विमा भरण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होते. मात्र अद्याप जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पीक विमा स्वीकारला जात नाही. यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी वरिष्ठांकडून मार्गदर्शन मागवून जिल्ह्यातील बँकांना पीक विमा भरण्यासंदर्भात सूचना द्याव्यात अशी मागणी शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी केली**



**आहे. पीक विमा भरण्यास उशीर झाला तर संतप्त शेतकरी जिल्हाधिकाऱ्यांची गाडी अडवतील असा इशारा थावरे यांनी दिला आहे.**

पावसामुळे पिकांचे नुकसानभरपाईसाठी शासनाकडून दरवर्षी १० जुलैपूर्वीच बँकांमध्ये पीक विमा भरण्यास सुरुवात होते. मात्र अजुनही शासनाकडून अधिकृतपणे पीक विमा भरण्यास सुरुवात झाली नाही. यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पीक विमा भरण्यास सुरुवात करण्याऐवजी शासनाने एक रुपयात पीक विमा काढण्याची योजना बंद केली आहे. ही योजना शासनाने बंद करण्यापेक्षा शेतकऱ्यांनीच ही योजना नाकारली आहे. आता जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पीक विमा भरण्यासंदर्भात वरिष्ठांकडून मार्गदर्शन मागवावे व शेतकऱ्यांचा पीक विमा भरण्यासंदर्भात संबंधीत यंत्रणेला आदेशित करावे, अशी मागणी भाई गंगाभिषण थावरे यांनी केली आहे.

# सदगुरूच योग्य मार्ग दाखवून कल्याणाचा महामंत्र देतो -सुश्री अन्नपूर्णा भारतीजी

## परळीत दिव्य ज्योति जाग्रति संस्थानच्या गुरूपोर्णिमा उत्सवाला भाविकांची मोठी गर्दी

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**दिव्य ज्योति जागृती संस्थान लातूर शाखेच्या वतीने प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने हालगे गार्डन परळी वैजनाथ येथे गुरूपोर्णिमा महोत्सव अत्यंत भव्य, दिव्य व भक्तिमय वातावरणात मोठया उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला हजारो भाविकांनी उपस्थित राहुन गुरूचरित्राचा महिमा अनुभवला.**

कार्यक्रमाची सुरूवात परळी



शहरातील मान्यवरांच्या हस्ते पवित्र दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर श्री गुरूंची आरती, भजने व भक्तीमय वातावरणात संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झाला. यानंतर प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपापात्र शिष्या दिल्ली येथील सुप्रसिद्ध भागवत भास्कर कथा व्यास सुश्री पद्महस्ता भारतीजी यांनी आपल्या सुमधूर वाणीतील प्रवचनातून गुरूंचे जीवनातील स्थान, त्यांची शास्त्रोक्त महती, अध्यात्मिक मार्गदर्शनाचे महत्व यावर सखोल विचार मांडले. त्यांनी वेद-उपनिषदे तसेच विविध संतांच्या उदाहरणांच्या ▶▶ पान २ वर...